नियमित फौजदारी खटला २९/२०१६
नि.४७

**सरकार पक्षातर्फे सा.क्र. १ याचा जबाब शपथेवर सुरू**

नाव – प्रविण बब्रुव्हान ओहोल.
वय – ५१ वर्षे
पद– जिल्हा मृद सर्व्हेक्षण व मृद चाचणी अधिकारी
मुख्यालय– सिंधुदुर्गनगरी ओरोस , ता.कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

**सरतपास विशेष सह सहायक सरकारी वकील श्री.एम.एस.भणगे**

सन २०१२ ते २०२० या कालावधीत मी फर्टीलायझर इन्स्पेक्टर म्हणून ओरोस येथे कार्यरत होतो. ऑगस्ट २०१२ मध्ये मी सदर पदावर हजर झालो. माझे पुर्वाधिकारी यांनी जून २०१२ मध्ये तालुका खरेदी विक्री संघ, कुडाळ यांचेकडून १८:१८:१० या खताचा एक नमुना तपासणीसाठी घेतला होता. तो शासकीय खत चाचणी प्रयोगशाळा, पुणे येथे परिक्षणासाठी पाठविला होता. जुलै २०१२ मध्ये सदर शासकीय खत चाचणी प्रयोगशाळा, पुणे यांचा अहवाल प्राप्त झाला की, 'सदरचे खत अप्रमाणित आहे.' त्यामध्ये नायट्रोजन, फॉस्फरस व पोटॅश यांचे प्रमाण १८:१८:१० असे नव्हते. क्षम्य मर्यादा ०.६० अशी आहे. सदर मर्यादेपर्यंत फरक असल्यास तो चालू शकतो. मला आता शासकीय खत चाचणी प्रयोगशाळा, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेला अहवाल दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर रासायनिक विश्लेषक यांची स्वाक्षरी आहे. सदर अहवालास नि. <u>४८</u> देण्यात आली. माझे पुर्वाधिकारी यांनी नोव्हेंबर २०१२ मध्ये मला पदभार दिला. नि. ४८ येथील अहवालाबाबत मी आरोपी क्रमांक १ ते ३ यांना कारणे दाखवा नोटीस पाठविली. मला आता मी आरोपींना पाठविलेल्या नोटीसीची प्रत दाखविण्यात आली. त्यातील मजकूर बरोबर आहे.

(सदर कागदपत्रावर तारीख तसेच स्वाक्षरी नाही. तसेच जावक क्रमांक नमूद नाही, त्यामुळे सदर नोटीसीच्या प्रतीस निशाणी देण्यात आलेली नाही.)

आरोपी क्रमांक १ म्हणजे खत उत्पादक कंपनी आणि आरोपी क्रमांक २ म्हणजे खत वितरण कंपनी यांचे उत्तर आले की, आम्ही तुमच्या अहवालाशी सहमत नाही, आणि आम्हाला खताचे पुनर्विश्लेषण करुन हवे आहे. आरोपी क्रमांक १ म्हणजे खत उत्पादक कंपनी यांचेकडून आलेले सदर मूळ उत्तर मला आता दाखविण्यात आले. त्यास नि.<u>४९</u> देण्यात आली. सदर पत्राची प्रत

आरोपींकडून अपिलिय प्राधिकारी यांना देखील पाठविण्यात आली होती. आरोपी क्रमांक १ व २ यांनी अपिलिय प्राधिकारी यांच्याकडे खत पुनर्विश्लेषणासाठी अपील केले. त्यानंतर आरोपी क्रमांक ३ म्हणजे तालुका खरेदी विक्री संघ, कुडाळ यांचे खुलासा उत्तर प्राप्त झाले की, 'आमचा खताच्या गुणवत्तेशी संबंध येत नसून आम्ही प्राप्त झालेल्या खताची थेट विक्री करतो'. आरोपी क्रमांक ३ म्हणजे तालुका खरेदी विक्री संघ, कुडाळ यांचेकडून आलेले सदर मूळ उत्तर मला आता दाखविण्यात आले. त्यास नि.**५०** देण्यात आली. आरोपी क्रमांक १ व २ यांनी खत पुनर्विश्लेषणासाठी अपील दाखल केल्यानंतर मी डिसेंबर २०१२ मध्ये माझे पुर्वाधिकारी यांनी तपासणीसाठी घेतलेल्या तीन नमुन्यांपैकी आमच्या ताब्यातील उर्वरित खत नमुना अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे शिपाई यांच्यामार्फत पाठविला. अपिलिय प्राधिकारी यांनी २०१३ मध्ये पत्रान्वये कळविले की, तुमचेकडून प्राप्त झालेला खत नमुना आम्ही बिहार मधील पाटणा येथील शासकीय प्रयोगशाळेत पाठविला होता तेव्हा तेथेदेखील तो अप्रमाणित असल्याचे घोषित करण्यात आले. जुन्या नियमाप्रमाणे म्हणजे त्यावेळच्या नियमाप्रमाणे पुनर्विश्लेषणाची संधी एकदाच मिळत होती. जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सिंधुदुर्ग यांनी कोर्ट प्रकरण दाखल करण्याबाबत लेखी निर्देश दिले. सदर मूळ लेखी आदेश मला आता दाखविण्यात आला. त्यावर जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सिंधुदुर्ग यांची स्वाक्षरी आहे. सदर पत्रास नि.**५१** देण्यात आली. त्याप्रमाणे मी कुडाळ येथील न्यायालयात प्रस्तुत प्रकरण दाखल केले. मला आता फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास नि.**५२** देण्यात आली. मी आरोपी क्रमांक ३ म्हणजे स्थानिक विक्रेता यांना ओळखतो. तो न्यायालयात हजर आहे.

<u>सरतपास पूर्ण</u>.

<u>नि.५५ वरील आदेशान्वये उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब .</u>

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.

समक्ष

Digitally signed by ANITA BALASAHEB KURANE
Date: 2023.04.17 13:01:03 +0530

(अ. बा. कुरणे)

दि.१७.०४.२०२३

मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.